*Dr. Kirit Somaiya*
**B.Com, FCA, Ph.D.**
*Ex-Member of Parliament*
*Member, BJP National Executive*
*Vice President, BJP Maharashtra*

**Bharatiya Janata Party**
**भारतीय जनता पार्टी**

पत्रकार परिषदेत डॉ. किरीट सोमैय्या आणि श्री. गोपाळ शेट्टी यांनी वितरित केलेले प्रसिद्धी पत्रक

जुलै ४, २००८

## ७/११ मुंबई बॉम्बस्फोट - तपास ठप्प

**७२३ दिवसांनंतर**, भयानक ७/११ मुंबई बॉम्बस्फोटांचा तपास, कृती ठप्प झाली आहे. राज्य सरकार आणि केंद्र सरकारच्या हलगर्जीपणाचा परिणाम **"शून्य"** प्रगतीत झाला आहे. फरारी म्हणून घोषित केलेले १५ दहशतवादी अजूनही मोकळेच आडेत. ही आश्चर्याची गोष्ट आहे कि महाराष्ट्र सरकार किंवा केंद्र सरकारने हा विषय पाकिस्तान सरकार किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर इतर देश, संघटना यांच्याकडे उपस्थित केलेला नाही. भाजप नेते डॉ. किरीट सोमैय्या आणि श्री. गोपाळ शेट्टी यांनी तपासातील हलगर्जीपणासाठी कॉंग्रेस सरकारच्या मतपेढीच्या राजकारणाचा तीव्र धिक्कार केला.

पाकिस्तानी दहशतवाद्यांचा विषय भारत सरकारचे गृह मंत्रालय आणि विदेश व्यवहार मंत्रालय हाती घेणार होते. राज्य सरकारने सातत्याने पाठपुरावा करणे आवश्यक होते. पण सर्व काही ठप्प झाले आहे.

सध्या दहशतवादी/आरोपीनी सर्वोच्च न्यायालयाकडून स्थगिती मिळवली आहे. त्यांनी मोक्का न्यायालयाच्या कायदेशीर वैधतेलाच आव्हान दिले आहे. २९ फेब्रुवारी २००८ रोजीच्या सुनावणीसमक्ष सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. पुढची सुनावणी १६ जुलै २००८ रोजी होणार आहे.

***प्रसिद्धी सचिव***

**BJP Office :** ● 11, Ashoka Road, New Delhi 110 001

➔**Please Reply :** 9C, Neelam Nagar, Mulund (E), Mumbai 400 081- Tel21639649/21634152
(M)9869220027 ● Fax : 21637432 - Email: kirit@vsnl.in, neelamnagar@rediffmaill.com
Website : www.kiritsomaiya.com